# उल्हासनगर महानगरपालिका

जा.क्र/उमपा /मालमत्ता /५११/१६
दिनांकः— २८/१२/ २०१६

## आदेश

जनहित याचिका क्र. १७३/२०१० (डॉ. महेश बेडेकर, वि. महाराष्ट्र शासन व इतर) यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिनांक १०,११,१२ व दिनांक १६/०८/२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार ध्वनीप्रदुषण नियम २००० मधील नियम ७ नुसार महापालिका क्षेत्रात ध्वनीप्रदुषण नियमांच्या उल्लंघनाच्या तक्रारीसंदर्भात तसेच मोठया सार्वजनिक सण, उत्सवांच्यावेळी रस्त्यावर, पदपथावर उभारण्यात येणाऱ्या तात्पूरत्या मंडपासंदर्भात प्राप्त परवानगी पत्रातील अटींच्या उल्लंघनांबाबत उचित कार्यवाही होण्यासाठी खालिलप्रमाणे सदस्यांची महानगरपालिकेच्या प्रभाग समिती स्तरावर समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी/पदाधिकारी | समितीतील पद |
|---|---|---|
| १ | संबधित सहा.आयुक्त तथा प्रभाग अधिकारी | अध्यक्ष |
| २ | संबधित प्रभागातील पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक अथवा त्यानी प्राधिकृत केलेले अधिकारी | सदस्य |
| ३ | संबधित प्रभागातील वाहतुक निरीक्षक अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी | सदस्य |
| ४ | संबंधित प्रभागातील कनिष्ठ अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग) | सदस्य |

तरी वरिलप्रमाणे गठीत केलेल्या समितीने मोठया धार्मिक सण, उत्सवांच्या ७ दिवस अगोदर महानगरपालिका क्षेत्रात संबधित ठिकाणी भेटी देवून महापालिकेच्या परवानगीशिवाय तात्पूरत्या स्वरुपात मंडप व तत्सम रचना उभारण्यात येत नसल्याची खातरजमा करावयाची आहे.

तसेच परवानगी पत्र व त्यासंदर्भातील तपशिल प्रदर्शित न करणारी रचना/मंडप बेकायदेशीर ठरवून अशा मंडपांचा तपशिल मालमत्ता विभागाकडे वेळोवेळी सादर करावयाचा आहे.

सदर समितीतील सदस्यांनी समन्वय राखून आपली जबाबदारी पार पाडावयाची आहे यामध्ये कसूर होणार नाही तसेच मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशांचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२८/१२/२०१६

आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,

सर्व संबंधित सहा आयुक्त तथा प्रभाग अधिकारी,
प्रभाग समिती कार्यालय क्र. १ ते ४, उल्हासनगर महानगरपालिका

प्रतः— १) उपायुक्त (पोलिस) परिमंडळ — ४, उल्हासनगर — ३ यांना प्रत माहितीस्तव
२) सहा.पोलिस आयुक्त (वाहतुक शाखा), उल्हासनगर — १
३) जनसंपर्क कार्यालय तथा तक्रार निवारण कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका

18.1.17

4/1/2017
पोलीस उपायुक्त
परिमंडळ ४, उल्हासनगर (करिता)